# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

**महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ**
**(महाविद्यालयीन विभाग)**

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली ४४२६०५(महा.) फोन:०७१३२.२१६५५४,२२३१०४,२१६५९४फॅक्स रू ०७१३२,२२३३२२
**Email : arcollegesectiongug48@gmail.com web:gondwana.digitaluniversity.ac web:gondwanauniversity.org**

(डॉ. जे. व्हि. दडवे)
संचालक (प्रभारी)

क्रमांक/महा.वि/गो.वि./९८४/२०१६
दिनांक :-२९/११/२०१६

प्रति,
मा. प्राचार्य/अध्यक्ष/सचिव,
संलग्नित सर्व महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय:— न्यायालयीन प्रकरणी शासकीय संस्था/महाविद्यालयीन स्तरावर जनसंपर्क अधिकारी (समन्वयक) यांची नेमणुक करण्याबाबत

संदर्भ:— १) मा. सहसंचालक याचे पत्र क्र. उशिनाग/न्या.प्र/८७००/१६ दि. ०४/१०/२०१६
२)शासन परिपत्रक क्र—संकीर्ण—२०१५/(प्रक्र २९१/१५)/मशि—१ दि. १.७.२०१५

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये पत्राचे अवलोकन करून आपल्या महाविद्यालयातील कार्यरत असलेले प्रशासनातील अधिकारी यांना जनसंपर्क अधिकारी (समन्वयक) म्हणून आपल्या स्तरावर नेमणुक करण्यात यावे. व त्यांचे नाव मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर यांना उलट टपाली सादर करून त्याची एक प्रत विद्यापीठात सादर करण्यात यावे

संलग्नित:—संदर्भीय पत्र

(डॉ. जे. व्ही. दडवे)
संचालक (प्रभारी)
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतीलीपी माहितीकरिता अग्रेषित—**

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुबंई—३२
२.मा. शिक्षण संचालक,(उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे—१
३.मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर

महाराष्ट्र शासन

कार्यालय सहसंचालक,उच्च शिक्षण नागपूर विभाग नागपूर.
जूने मॉरीस कॉलेज ईमारत परीसर सिताबर्डी,नागपूर.
(दुरध्वनी क्र.२५५४२१०/२५६१७१३ फॅक्स क्र.०७१२-२५५४२१०)

Website.www.dirhe.org.in/jdnagpur Email-jdhengp @rediffmail.com

**न्यायालयीन प्रकरण/अतितात्काळ/परिपत्रक**

क्रः- उशिनाग/न्या.प्र/२८७७/१६
दिनांक-४/१०/२०१६.

प्रति,
सर्व संचालक/प्राचार्य
शासकीय ~~संस्था~~/महाविद्यालय/~~अध्यापक महाविद्यालये~~
नागपूर विभाग नागपूर. (Govt)

**विषय :- न्यायालयीन प्रकरणी शासकीय संस्था/महाविद्यालयीन स्तरावर जनसंपर्क अधिकारी (समन्वयक) यांची नेमणुक करण्याबाबत...**

**संदर्भ :-** शासन परिपत्रक क्र-संकीर्ण-२०१५/(प्रक्र२९१/१५)/मशि-१,दि-१.७.२०१५.

या विभागामधील शासकीय संस्था/महाविद्यालयामधील अधिकारी/कर्मचारी यांच्याद्वारे मा.उच्च न्यायालय, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मा.औद्योगिक व कामगार न्यायालयामध्ये शासन तसेच उच्च शिक्षण संचालनालयाच्याअधिपत्याखालील शासकीय संस्था/महाविद्यालय विरोधात याचिका दाखल करण्यात येतात त्यामध्ये विभागीय सहसंचालक तसेच संबंधित संस्था/महाविद्यालयातील संचालक/प्राचार्यांना प्रतिवादी करण्यात येते.

२. या विभागामधील शासकीय संस्था/महाविद्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी दाखल केलेले याचिकांवरील परिच्छेद निहाय अभिप्राय विहीत कालावधीत तयारकरणे आवश्यक असते. सदर न्यायालयीन प्रकरणांमध्ये संबंधित कर्मचारी व अधिकारी यांचे सेवाविषयक सर्व आवश्यक कागदपत्रे संबंधित शासकीय संस्था/महाविद्यालयातील आस्थापनेवर ठेवण्यात येतात. त्यामुळे अशा न्यायालयीन प्रकरणांमध्ये वस्तुस्थितीदर्शक अहवाल व आवश्यक कागदपत्रे वेळोवेळी संबंधित शासकीय संस्था/महाविद्यालयाकडुन मागविण्यात येते. तथापि असे निदर्शनास आले आहे की, न्यायालयीन प्रकरणांमध्ये मागविलेली माहिती संदर्भात सुटे सेवा विषयककागदपत्रे/ अनावश्यक कागदपत्रे व सेवापुस्तक सादर करण्यात येते. परंतु त्यासोबत कोणत्याही प्रकारचे वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्यात येत नाही. तसेच सदरची माहिती वेळेच्या आत सादर करण्यात टाळाटाळ करण्यात येते. न्यायालयीन प्रकरणामध्ये वेळोवेळी उद्‌भवणारे प्रश्नावर संबंधित शासकीय संस्था/महाविद्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्याशी चर्चा केली असता त्यांना या प्रकरणामधील काहीही माहिती नाही, असे सांगण्यात येते. ज्यामुळे प्रकरणामध्ये अनावश्यक अडचणी निर्माण होतात. परीणामी प्रशासकीय विभागातील मा.प्रधान सचिव, मा.शिक्षण संचालक तसेच विभागीय सहसंचालक यांना मा.न्यायालयापुढे प्रत्यक्ष हजर राहण्याचे आदेश होतात किंवा अवमान याचिका दाखल करण्यात येते.

f:\circular.doc

सहा. कुलसचिव (म.वि.)
कार्यवाही व्हावी.

३. शासकीय संस्था/महाविद्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी मा.न्यायालयांमध्ये दाखल केलेले याचिकांमध्ये विभागीय कार्यालयास वरील अडचणी उदभवु नये म्हणुन शासकीय संस्था/महाविद्यालयातील कार्यरत असलेले प्रशासनातील अधिकारी यांना जनसंपर्क अधिकारी (समन्वयक) म्हणुन आपल्यास्तरावर नेमणुक करण्यात यावी व त्यांचे नाव या कार्यालयास उलट-टपाली सादर करण्यात यावे.

४. संबंधित जनसंपर्क अधिकारी (समन्वयक) यांना संस्था/महाविद्यालयास प्रलंबित व निकाली निघालेल्या सर्व न्यायालयीन प्रकरणांची माहिती देण्यात यावी. तसेच या कार्यालयाकडुन वेळोवेळी मागविण्यात आलेली माहिती, कार्यालय प्रमुखामार्फत वरिष्ठ कार्यालयास पुरविण्याची जबाबदारी जनसंपर्क अधिकारी (समन्वयक) व संबंधित कार्यालयाची राहील. जनसंपर्क अधिकारी (समन्वयक) यांनी आवश्यक असल्यास मा.न्यायालयामधील शासकीय अधिवक्ता यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करणे व त्यांनी विचारणा केलेले प्रश्नांचे निराकरण करणे तसेच वेळोवेळी न्यायालयीन प्रकरणांमधील सुनावणीच्या वेळी उपस्थित राहुन न्यायालयीन प्रकरणाची अद्यावत माहिती घेणे, आवश्यक असल्यास वरिष्ठ कार्यालयाकडुन (वस्तुस्थिती नमुद करुन) मार्गदर्शन मागविण्याकरीता पाठपुरावा करण्याची जबाबदारी संबंधित जनसंपर्क अधिकारी (समन्वयक) व संबंधित कार्यालयाची राहील.

A.M. Rahatgaonkar

(डॉ.अंजली रहाटगांवकर)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर.

**प्रत** — १. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांना माहितस्तव सविनय सादर.
२. मा.शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव सविनय सादर.
२. आस्थपना विभाग प्रस्तुत कार्यालय.